● छत्रपती संभाजीनगर ● वर्ष : २ रे ●अंक : १०३ वा ● शनिवार दि.६ डिसेंबर २०२५ ●किंमत ५.०० रू ● पाने : ०४ ● nilepratik02@gmail.com ● दैनिक



संपादकीय

## बाबासाहेबांचे स्वप्न आणि समाजाची खरी परीक्षा

**महापरिनिर्वाण दिनानिमित्त लेखाजोखा**




Image: wikimedi

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन म्हणजे भावनिक उद्गारांची परंपरा नव्हे, तर तो आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. भारतीय लोकशाहीचे शिल्पकार, सामाजिक क्रांतीचे जनक आणि मनुष्याला मनुष्य बनवण्याचा ध्यास घेतलेला तो भव्य महामानव , पण आज आपण त्यांचे वारस म्हणुन घेण्याच्या योग्यतेतून बाहेर पडत आहोत का? हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे.

बाबासाहेबांचे स्वप्न, आपण फसवलेली सर्वात मोठी प्रतिज्ञा.

बाबासाहेबांनी स्वप्न पाहिले होते माणूस म्हणून जगण्याचे. समतेचे, समाज, तर्कशुद्ध राजकारण, बंधुभावाने उभा राहिलेला राष्ट्रवाद. पण आपण या स्वप्नांच्या राखेवर राजकारण शेकतो आहोत.

आज बहुजन समाजाला नेमके काय हवे? न्याय की जात? समता की सवलती? संघर्ष की सेल्फी? हे आपणच ठरवणार. कारण बाबासाहेबांनी तर सांगून ठेवले आहे,I can work for you, but I cannot work in your place.

आज आपण स्वतःच्या जागी अजून कोणीतरी लढेल अशी अपेक्षा ठेवून बसलो आहोत.

बाबासाहेबांचे विचार, आपण केलेल्या विश्वासघाताचे आरसे.

बाबासाहेबांनी धर्मसत्ता, जातीसत्ता, निरक्षरता आणि अंधश्रद्धेला सर्वात मोठे संकट म्हटले. पण आजचा बहुजन समाज पुन्हा तिथेच पोहोचला आहे. धर्मभ्रमात अडकलेले तरुण, जातीवरून तोडलेले मतदार, आणि तर्क सोडून भावनेला शरण गेलेले नागरिक, जाती–जातीमध्ये भेद, हे आजचे कटू वास्तव आहे. संघर्षाची परंपरा सोडून सण आणि सेलिब्रेशनकडे, अंधश्रद्धेकडे झुकलेला समाज ही बाबासाहेबांच्या विचारांची सर्वात मोठी हत्या आहे.

बाबासाहेबांचे योगदान जेवढे मोठे, तेवढाच मोठा आपला अपयशाचा आकार आहे. भारतीय संविधान लिहिणारा महापुरुष एका समुदायाचा नव्हता; तो संपूर्ण मानवतेचा होऊन गेला. त्यांनी दिलेले हक्क,शिक्षण, आरक्षण, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता हे आपल्या हातातले शस्त्र होते. पण आपण त्याच शस्त्रांनी स्वतःच्या पायावर वार केला. आरक्षणवादी तर आहोत, पण शिक्षणाला प्राधान्य देत नाही. समानता बोलतो, पण जातीत विभागलेलो आहोत,

लोकशाहीचा जयजयकार करतो, पण मतपेटीत स्वतःला विकतो. बाबासाहेबांनी दिलेली किल्ली आपण कधीच तिजोरीत घातलीच नाही. बहुजनांचे राजकारण, सत्ता बहुसंख्याची नाही, तर जागे झालेल्यांची असते.

राजकीय सत्ता मिळाली नाही याचे एकच कारण, विखुरलेला समाज.

आपण बहुसंख्य आहोत, पण प्रभावी नाही.आपण संख्या आहोत, पण शक्ती नाही.

आपल्याकडे मतदार आहेत, पण मतधिक्य नाही.

बहुजन समाज आजही विविध जातगटांत विभागलेला आहे. ज्यांना जातीअंताच्या लढाईत एकत्र व्हायला हवे आहे, ते आजसुद्धा लहान–लहान चौकटींमध्ये बंदिस्त आहेत. जो समाज तुटतो, तो कधीच सत्ताधारी जमात बनू शकत नाही. जो समाज एकत्र राहतो, त्याच्याच हातात सत्ता येते, हा इतिहास आहे.

**जातिवाद, आधुनिक रूपात अधिक विषारी**

जातिवाद संपेल का ?

बाबासाहेब म्हणाले होते, Caste is not merely a division of labour. It is a division of labourers.

आज परिस्थिती अधिक भीषण आहे: सोशल मीडियातून नवे जातीय द्वेषविष, राजकीय गणितात जातीनुसार मोडतोड,

उच्चशिक्षणात अदृश्य भेदभाव, रोजगारात जातीनुसार रोखलेली प्रगती,

प्रेम, विवाह, व्यवसायात उघड–उघड जातीय बंदिवास्त. जातिवाद संपवायचा असेल तर आधी आपण विचार करायला सुरुवात करावी लागेल, जात माझ्यासाठी आहे की मी जातीसाठी?

संविधानाची अंमलबजावणी, फोल घोषणांचे अंतरंग

संविधान पुस्तकात पूर्ण आहे; व्यवहारात अपंग आहे.

न्यायव्यवस्थेत सामाजिक प्रतिनिधित्व कमी आहे,

प्रशासन सवर्णवर्चस्वाखाली आहे.गरीब, वंचित, दलित यांच्यावर सतत अन्याय, मुक्त अभिव्यक्तीवर गदा, सामाजिक न्याय हे शब्दापुरते मर्यादित, राज्यघटना फक्त अस्तित्वात असून उपयोग नाही; ती जीवनात उतरली पाहिजे. पण तिची हत्या करणारे कायदे, धोरणे आणि निर्णय रोज नजरेसमोर चालू आहेत. राजकारणी रोज लोकशाहीची हत्या करत आहे. लोकशाहीचे भविष्य, जागले नाही तर गुलामी नक्की लोकशाही टिकते मतपेटीने; ती टिकते जागृत नागरिकाने. जर आपण, प्रश्न विचारणे सोडले, चुकीला चुक म्हणून नाकारले नाही, जात–धर्माच्या मृगजळात धावत राहिलो, विवेकशक्ती बोथट केली, तर लोकशाहीचा अंत निश्चित आहे. लोकशाही संपत नाही, ती सतत कमकुवत होत जाते आणि आपण त्या प्रक्रियेचे सहकारी बनतो. आज बाबासाहेबांना फुलमाळा चढवणे सोपे आहे, त्यांचा जयजयकार करणे सोपे आहे, पण त्यांच्या विचारांचे ओझे उचलणे कठीण आहे. ते ओझे उचलण्याचे सामर्थ्य समाज दाखवेल का..? बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण करायचे असेल तर,

जातभेद तोडा ,विवेक जागवा सक्षम नेतृत्व निवडा, शिक्षणाला सर्वोच्च महत्व द्या, संघटना मजबूत करा, आणि राजकीय सत्ता घेण्याची तयारी ठेवा. कारण बाबासाहेबांचे स्वप्न आपण बरे, आपले काम बरे असे नव्हते.ते होते समाजाचे नवजीवन घडविण्याचे. आज बाबासाहेब विचारत आहे. माझ्या मुलांनो, प्रकाश कुठे आहे ? तुम्ही अजूनही अंधारातच का? प्रकाशाकडे वाटचाल करा तरच तुमचे कल्याण आहे. हा प्रश्न टाळून आपण कुठल्याही स्मरणदिनाचे औचित्य सिद्ध करू शकत नाही.स्वप्न अजूनही अपूर्ण आहे, पण त्याची पूर्तता करण्याची ताकद आपल्याच हातात आहे. जागा, अन्यथा इतिहास आपल्याला माफ करणार नाही.

# बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुण्यतिथीला 'महापरिनिर्वाण दिन' म्हणून ओळखले जाते. दरवर्षी ६ डिसेंबर रोजी हा दिवस देशभर अत्यंत आदराने पाळला जातो. या दिवसाचे महत्त्व, इतिहास आणि पार्श्वभूमी खालीलप्रमाणे आहे:

१. महापरिनिर्वाण म्हणजे काय?

'महापरिनिर्वाण' हा बौद्ध धर्मातील एक अत्यंत पवित्र शब्द आहे. बौद्ध तत्त्वज्ञानानुसार, जो व्यक्ती निर्वाण प्राप्त करतो (म्हणजेच ज्याला जीवनाचे खरे सार समजलेले असते आणि जो दुःख व वासनेच्या पलीकडे गेलेला असतो), त्याच्या मृत्यूला 'मृत्यू' न म्हणता 'महापरिनिर्वाण' म्हटले जाते.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती.

बौद्ध भिक्खू आणि अनुयायी बाबासाहेबांना 'बोधिसत्व' मानतात. त्यामुळे त्यांच्या निधनाला सामान्य मृत्यू न मानता 'महापरिनिर्वाण' असे संबोधले जाते.

२. इतिहास आणि पार्श्वभूमी

निधन: ६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्लीतील त्यांच्या निवासस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निधन झाले.

अंत्यसंस्कार: त्यांचे पार्थिव मुंबईला आणण्यात आले आणि दादर येथील चौपाटीवर त्यांच्यावर बौद्ध पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले.

चैत्यभूमी: ज्या ठिकाणी त्यांच्यावर अंत्यसंस्कार झाले, त्या जागेला आज 'चैत्यभूमी' म्हणून ओळखले जाते. हे ठिकाण आंबेडकरी अनुयायांसाठी अत्यंत श्रद्धेचे आणि पवित्र तीर्थस्थान आहे.

३. महापरिनिर्वाण दिनाचे महत्त्व

हा दिवस केवळ दुःख व्यक्त करण्याचा नसून बाबासाहेबांच्या विचारांना आणि कार्याला अभिवादन करण्याचा दिवस आहे.

संविधानाचे शिल्पकार: भारताला एक मजबूत आणि समतावादी संविधान दिल्याबद्दल या दिवशी देश त्यांना कृतज्ञता व्यक्त करतो.



सामाजिक समता: अस्पृश्यता निवारण, महिलांचे हक्क आणि कामगारांच्या हक्कांसाठी त्यांनी दिलेल्या लढ्याचे स्मरण या दिवशी केले जाते.

प्रेरणास्त्रोत: त्यांचे विचार आजही कोट्यवधी लोकांना अन्याय आणि शोषणाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देतात.

४. हा दिवस कसा पाळला जातो?

चैत्यभूमीवर गर्दी: ६ डिसेंबरला देश–विदेशातून लाखो अनुयायी मुंबईतील दादर येथील 'चैत्यभूमी'वर येतात आणि बाबासाहेबांना अभिवादन करतात.

अभिवादन सभा: शासकीय पातळीवर आणि विविध सामाजिक संस्थांमार्फत बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना मानवंदना दिली जाते. संसद भवनापासून ते ग्रामपंचायतींपर्यंत सर्वत्र त्यांना आदरांजली वाहिली जाते.

विचारांचा जागर: या दिवशी ठिकठिकाणी रॅली, विचारमंथन सभा, आणि त्यांच्या पुस्तकांचे प्रदर्शन भरवले जाते. लोक शांततेने मेणबत्त्या पेटवून त्यांना श्रद्धांजली वाहतात.

थोडक्यात सांगायचे तर, महापरिनिर्वाण दिन हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या त्यागाची, बुद्धिमत्तेची आणि त्यांनी केलेल्या महान कार्याची आठवण करून देणारा दिवस आहे.

# विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज सुधारक आणि प्रेरणास्थान

भीमरावांनी देशावरती प्रेम अलौकिक केले
इतिहासाचे पान सुवर्णी रंगवून ते गेले

हे गीत आजही मनाला स्पर्शून जाते. या गाण्याची आठवण यासाठी झाली की , आज ६ डिसेंबर. गेली ६८ वर्षे कोट्यावधी लोक आपल्या मुलाबाळांसह सातत्याने आपल्या मुक्तीदात्यास म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी दादर येथील चैत्यभूमीवर येतात. ६ डिसेंबर म्हटलं की, याची तयारी आधीपासूनच सुरु असते. या दिवसाची फारशी दखल जरी काही मनुवादी मिडियाने घेतली गेली नसली तरी आंबेडकरवादी वृत्तपत्रातून डॉ. बाबासाहेबांचे विचार समाजात पसरत चालले आहेत. बाबासाहेबांनी माळरानावरील निवडुंगाप्रमाणे गावकुसाबाहेर राहणाऱ्या लोकांना माणूस म्हणून जगण्याचा तसेच त्यांचा समाजातील असलेला मूलभूत अधिकार दिला. कामगार, स्त्रिया अगदी तळागाळात वंचित जीवन कंठणाऱ्या लोकांच्या हक्कांसाठी ते दिवस–रात्र झटत राहिले. वर्षानुवर्ष जातीव्यवस्था मानणाऱ्या प्रस्थापित समाजातील मनुस्मृती जाळण्याचे धाडस डॉ. बाबासाहेबांनी दाखविले, महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह करुन पाण्यालाच आग लावली तसेच त्यावेळी काळाराम मंदिर प्रवेश करुन देवळातला काळारामही थरथरु लागला होता. समाजातील प्रतिगामी शक्तींना त्यांनी कडवा विरोध केला होता. त्याप्रमाणे लंडन येथे १९३० साली गोलमेज परिषद भरवली होती. त्या परिषदेत महात्मा गांधीसह अनेक मतबबर मंडळी सहभागी झाली होती. त्याच मंडळीमध्ये डॉ. बाबासाहेब ही सामील झाले होते. त्यावेळी प्रथमच भारताच्या शोषित , वंचित समाजाची मूलभूत हक्कांची कैफियत मांडून बहिष्कृत समाजाचे दुःख जगा समोर आणले होतेडॉ . बाबासाहेबांनी कितीतरी सत्याग्रह आंदोलने माणूसकीच्या हक्कासाठी लढविली आणि समस्त सनातनी कर्मठ वर्गाला हादरवून सोडले होते. वर्षानुवर्षे चार्तुवर्ण पद्धतीतून जन्माला आलेली जाती–पाती विरुध्दची लढाई बाबासाहेबांनी आपल्या एका लेखणीने लढविली. तलवारीच्या पातीपेक्षा धार होती बाबांच्या लेखणीला आणि त्याच लेखणीचा उपयोग करुन आपल्याला स्वतंत्र भारताला मोलाचे संविधानही दिले आणि या देशात लोकशाही प्रस्तापित करून इथल्या सर्व भारतीयांना मतदानाचा अधिकार दिला. सुरवातीला सांगितल्या प्रमाणे आज ६ डिसेंबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाण दिन. त्यानिमित्ताने गेली ६८ वर्षे राज्यातील कानाकोपऱ्यातून आंबेडकरवादी जनता बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी येते. त्यात अगदी वयाची सत्तर – ऐंशी वर्षे पार केलेले ज्येष्ठ नागरिकांपासून ते दोन–तीन तान्हुल्या बाळापर्यंतची सर्व वयोगटातील माणसे सामिल असतात. जणु त्या दिवशी संपूर्ण दादरला निळा जनसमुदाय उसळतो. एरव्ही नवसाच्या देवाच्या लांबलचक रांगेचे अप्रुप वाटणाऱ्या उच्चभ्रू समाजाने या चैत्यभूमीवरील गर्दीला कितीही नाक मुरडली तरी या गर्दीची इतर कोणत्याही गर्दीशी तुलना करता येणार नाही. ही गर्दी अशीच यापुढे येतच राहणार. दरवर्षी.. वर्षानुवर्षे... कारण या गर्दीला ओढ आहे, ती बाबासाहेबांची, त्यांच्या विचारांची आणि त्यांना जाण आहे त्यांनी केलेल्या उद्धाराची... !

पण कधीकधी जाणवते की खरंच आपल्या देशात, आपल्या समाजात बाबासाहेबांचे विचार इतके भिनले गेले आहेत का? बाबासाहेबांनी जी स्वप्नं पाहिली ती खरंच साकार झाली? आज खेळाडू, गायकांना भारतरत्न हा देशातील सर्वोच्च पदाचा सन्मान दिला जातो. पण संविधानकर्ता असलेल्या विद्वानाला, ज्याने आपले सर्व आयुष्य अखंड समाजाच्या हितासाठी व्यतित केले, त्या महापुरुषाला भारतरत्न हा सर्वेच्च सन्मान मृत्यूनंतर अनेक वर्षांनी दिला जातो. हीच किती लजिरवाणी बाब आहे. डॉ. बाबासाहेबांनी आपल्याला जगातील सर्वोत्तम राज्यघटना दिली. त्याच संविधानावरच आपला भारत देश चालत आहे. पण इथली काही मनुवादी विचारसरणी हे बहुमूल्य असे संविधान नाकारत आहे. इथल्या काही प्रस्थापित वर्गाला बाबासाहेबांचे विचार आजही मान्य नाहीत. म्हणून तर १४ एप्रिल , धम्मचक्रपरिवर्तन दिन , ६ डिसेंबर अशा दिवशी त्या महामानवाच्या प्रतिमाची विटंबना केलेल्या घटना घडत असतात. तसेच काही ठिकाणी बौध्द कुटुंबाना वाळीत टाकणे, जयंती साजरी केली म्हणून बौध्द तरुणांची हत्या करणे, धिंड काढणे, स्त्रियांवर बलात्कारासारखे अमानुष प्रकार घडत असतात. खैरलांजली सारखा अमानुष प्रकार फुले–शाहु–आंबेडकर विचारधारा मानणाऱ्या महाराष्ट्रात घडणे म्हणजे या महामानवांच्या विचारधारेला तिलांजली देण्यासारखे आहे .आजही वेगवेगळ्या पक्ष, संघटना, राजकीय पुढारी यांच्या आपापसातील वादामुळे आपला समाज संभ्रमावस्थेतच राहिला. भगव्या आणि निळ्याची होणारी महायुती केवळ निवडणुकी पुरतीच मर्यादीत आणि सत्तेसाठीच मर्यादीत राहते. खरे तर डॉ . बाबासाहेबांनंतर आपल्या आंबेडकरवादी चळवळीची दशा आणि दिशाच भरकटत गेली. आपली तरुण मुले तर दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्र, होळी अशा सणांमध्ये जास्त रमायला लागली. काही जणांना तर साधं ऋजयभीम' बोलायला सुध्दा लाज वाटू लागते. ज्या बाबासाहेबांनी स्वत चंदनापरी झिजून प्रसंगी देशाच्या महात्म्याशी भांडून आपल्याला ऋबौध्द' अशी स्वतंत्र ओळख मिळवून दिली, त्याच महामानवाचे नाव घ्यायला आजची पिढी कचरत आहे. यात काही अपवाद असतीलच...काही तरुण आहेत ज्यांना खरच मनापासून चळवळीत काम करायचे आहे, भरकटणाऱ्या समाजाला योग्य दिशेला आणायचे आहे पण आपल्याच पुढारी आणि मंत्री – संत्र्यांमुळे आपले तरुण देखील वेगवेगळ्या संघटना, संस्था करुन बसले आहेत. अगदी सहज एखाद्या कार्यक्रमात जरी आपण भेटलो तरी असे तुम्ही अमक्या पक्षातले, तो तमक्या पक्षातले मग तुम्ही अमुक नेत्यालाच



मानता, तमुक महापुरुषाचेच विचार मांडता ह्या वरुनच वाद सुरु होताना दिसतात. आजच्या तारखेला पाहिले तर असंख्य आंबेडकरवादी संघटना, पक्ष निर्माण झालेले आहेत. खरं सांगायचे तर अक्षरश ह्या संघटनांनी, पक्षांनी तथागत गौतम बुध्द, छत्रपती शिवाजी, महात्मा फुले, छत्रपती शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच अनेक नेते वाटून घेतले आहेत. त्यामुळे पक्ष, संघटना यांच्या गोंधळलेला असलेला आपला समाज आणि त्यामधली येणारी नवी पिढी संभ्रमात पडत आहे.धर्मांतर करताना बाबासाहेबांनी ऋमी हिंदू म्हणून जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही' अशी भीमगर्जना करीत कर्मकाड न मानणारा विज्ञानाचे अधिष्ठान असलेला तथागत गौतमाचा बुध्दाचा बौद्धधम्म आपल्याला दिला. त्याच बरोबरच २२ प्रतिज्ञाही दिल्या. पण त्या २२ प्रतिज्ञा फार कमी लोक अंमलात आणतात. आज ही आपल्या महिला– पुरुष इतर धर्माकडे आकर्षित होत आहेत. उपास – नवस करणे, अमक्या भोंदू बाबाच्या नादी लागणे . गळ्यात हातात– पायात काळे , लाल रंगाचे धागे दोरे बाधने. आपल्याच लहान मुलांच्या पायात काळे दोरे बांधलेले दिसतात. दर वर्षी दादरला आजच्या दिवशी काही संघटना इथे आलेल्या लोकांच्या गळ्यात–हातात– पायात बांधलेले धागे दोरे कापायचे काम करते पण हे धागे दोरे कमीच होत नाही. ही आपल्या समाजाची शोकांतिका म्हणावी लागते. डॉ . बाबासाहेबांनी शिकून, संघटीत होऊन संघर्ष करण्याची शिकवण दिली. मात्र आज ही शिकवण किती जणांच्या लक्षात आहे? डॉ . बाबासाहेबांनी केवळ अस्पृश्यांसाठी नव्हे तर समस्त समाजातील प्रत्येक घटकांनी मग ती स्त्री असो वा पुरुष सर्वांनाच शिक्षण मिळावे म्हणून आरक्षणाची तरतूद केली. त्यामुळेच आपली मुलं शिकली, परदेशात जाऊ लागली, मोठ मोठ्या हुद्यावर अधिकारी म्हणून पदाधिकारी झाली. पण दुसरीकडे मात्र याच समाजात पराकोटीचे दारिद्र्य, बेकारी दिसते. समाजातील दोन – चार मुले शिकली म्हणजे सारा समाज शिक्षित झाला असे होत नाही. जर प्रकाशाच्या वाटेने जायचे आहे तर सार्यांनीच मिळून जायला नको का? जे शिक्षण मी मिळविले तेच माझ्या समाज बांधवाला सुध्दा मिळायला हवे, असे प्रत्येकानेच ठरवायला हवे. तेव्हाच कुठेतरी हा आपला समाज पुर्णपणे शिक्षित होऊ शकेल.

ज्या गावात आजही वीज पोहचली नाही त्या गावात बाबासाहेबांचे विचार मात्र पोहचले. अशी माणसं दूर खेडेगावातून दादर येथील शिवाजी पार्कवर येतात. दोन – चार दिवसाचा छोटासा संसार मांडतात. महानगर पालिका, काही सामाजिक संस्था, काही पक्ष, संघटना लोकांच्या सुख सुविधांसाठी वेगवेगळे उपकम राबवित असतात. अनेकजण घरी जाताना पुस्तक प्रदर्शनातील पुस्तकरुपी ज्ञानाचा खजिना घेऊन जातात. पण कुठेतरी एक गोष्ट नक्की खटकत असते ती म्हणजे या दिवसाचं गांभिर्य लक्षात घेऊन अभिवादन करायला जाताना सर्वानी पांढरे वस्त्र परिधान करणे गरजेचे असते परंतु काही महाभाग एखाद्या समारंभात गेल्यासारखे वावरत असतात. जास्त करून महिला सजून धजून केसात गजरा, फुले माळताना दिसतात. तरुणमुले तर चैत्यभूमीवर समाज माध्यमावर रील, फॉलो , लाईकच्या नादात व्हिडीओ बनवतात. आपण नेमके कशासाठी आलो आहोत ते विसरतात. एक लक्षात घ्या फक्त लाईक, शेअर आणि फॉलो आणि सबक्राइब वाढवण्यासाठी होणत्याही धम्म आणि धर्माचा वापर करू नये. या गोष्टी कुठेतरी थांबाव्यात असे वाटते . तसेच कोणत्याही प्रकारचा अनुचीत प्रकार घडवून या दिवसाला गालबोट लावू नये याचा चैत्यभूमीला भेट देणाऱ्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करणाऱ्या तुम्ही आम्ही अगदी पक्षातील नेत्यांनी सुध्दा याची दक्षता घेणे गरजेचे आहे.डॉ. बाबासाहेबांच्या भव्य स्मारकासाठीचे भिमसैनिकांनी केलेले इंदू मिलचे आंदोलन सर्वांच्या लक्षात आहे, परंतु स्मारक बांधल्यावर त्यात बौध्द धम्माचा, डॉ. बाबासाहेबांच्या स्मृती जपून ठेऊ पण त्याचबरोबर त्यांचे विचारही आपल्या रक्तात तितकेच भिनायला हवे. नुसते आपल्या मुक्तीदात्याला व्हाट्सएप, फेसबुकवर आणि इन्स्टासारख्या सोशल मीडियावर पोस्ट, फोटो टाकून अभिवादन करणे म्हणजे त्यांना आदरांजली वाहणे नव्हे तर त्यांचा विचार,त्यांनी दिलेला बौध्दधम्माचा वारसा खऱ्या अर्थाने जपणे होय, जसं लहान बाळाला रोगप्रतिकारक शक्तींची लस जन्मत:च दिली जाते त्याचप्रमाणे हे विचारही अगदी लहानपणापासून येणाऱ्या पिढीच्या नसानसांत वाहायला हवे. तरच ऋसारा भारत बौध्दमय करीन' हे बाबांनी पाहिलेलं स्वप्नं कधी तरी सत्यात उतरेल अशी आशा वाटते. शेवटी सांगायचं तात्पर्य काय की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार फक्त बौद्ध समाजापुरतेच नसून संपूर्ण देशालाच काय, सर्व जगालाच या विचारांची गरज आहे. येणाऱ्या पिढीला छत्रपती शिवरायांनी पाहिलेले स्वराज्याचे स्वप्न आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिलेलं स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित असलेला भारत पाहायला मिळेल यासाठी आपण सर्वांनीच एकत्र येऊन जोमाने प्रयत्न करायला हवे आणि जेव्हा हे प्रयत्न यशस्वी होतील तीच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना खरी आदरांजली असेल !

**मेघना सुर्वे –८४३३५०२९९४**

# मी भीम अनुयायी?

असंख्य आमच्या पिढ्या
गुलामगिरी करण्यात गेल्या,
या दुःखी जीवनाच्या बेड्या
भीमरायांनी आज तोडल्या!!
ज्ञानाच्या पदव्या घेऊन
आज सुखाने जगू लागलो,
पण या सुखाच्या मदमस्तीत
खरी चळवळ विसरून गेलो!!
जाती–धर्माच्या नावाखाली
आजही बळी घेतला जातो,
आज गुलाम झालेला पँथर
फक्त पोकळ डरकाळी देतो!!
एप्रिल आणि महाप्रयाण दिनी
आमच्या रक्तात भीम सळसळतो,
थोड्याथोड्या स्वार्थापायी
खापऱ्या बनण्यात धन्यता
मानतो!!
आज सागरही खळखळतो,
सच्चा भीमसैनिक येथे रडतो,
तू केलेल्या उपकराची जान
ठेऊन
प्रज्ञाचक्षूने वंदन करतो!!
कोटि कोटि वंदन बा भीमा,
तुझ्या चरणी मी लीन राहतो,
प्रबुद्ध भारत निर्माण करण्या
माझे जीवन समर्पित करतो!!

**–भिक्खु धम्मबोधी थेरो**
**मो.९०४९७०९६४५**








हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक रतन नामदेव साळवे यांनी सोलापूर तरूण भारत मिडिया लि., प्लॉट नं. १/३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को. ऑप सोसायटी लि. एमआयडीसी, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र– ४३१००१) येथे छापून एफ–४/ १४, अयोध्या नगर, एन –७, सिडको छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र– ४३१००१) येथे प्रसिद्ध केले. ※ संपादक : रतन नामदेव साळवे, मो. ९९२३५०२३२०, E-nilepratik02@gmail.com

# देशाला ऐतिहासिक क्रांतिकारी दस्तऐवज देऊन गेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर

६ डिसेंबर १९५६ हा दिवस भारताच्या सामाजिक–राजकीय इतिहासातील एक अविस्मरणीय दिवस आहे. या दिवशी न्याय, समता, बंधुता आणि स्वातंत्र्य यांचे अनन्यसाधारण पुरस्कर्ते, लाखो निराधारांचे आधारस्तंभ, भारताच्या परिवर्तनाचा शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महापरिनिर्वाण झाले. आजही त्यांचे विचार, त्यांचे कार्य आणि त्यांनी दिलेला क्रांतिकारी दस्तऐवज – भारतीय संविधान – देशाच्या मार्गदर्शनासाठी दीपस्तंभासारखा उभा आहे. डॉ. आंबेडकर हे केवळ संविधानकार नव्हते; ते भारताला आधुनिक राष्ट्र म्हणून उभे करण्याचे स्वप्न पाहणारे समाजक्रांतिकारक होते. त्यांनी गुलामगिरी, अस्पृश्यता, विषमता आणि अन्याय यांच्या काळोखात शतकानुशतके अडकलेल्या समाजाला पुनरुज्जीवनाचे नवे महामार्ग दिले. भारतीय राज्यघटना ही फक्त कायद्यांची जंत्री नसून मानवी गौरवाचा दस्तऐवज आहे. तिच्या प्रत्येक कलमात आंबेडकरांचे अंत:करण, त्यांचा संघर्ष, त्यांची वेदना आणि त्यांच्या समाजदर्शनाची व्यापकता दिसून येते.

स्वातंत्र्यानंतरचे भारताचे भवितव्य कसे असावे– देश कोणत्या मूल्यांवर उभा राहावा, जनतेला कोणते हक्क असावेत, वंचित–विमुक्त घटकांना न्याय मिळण्याची हमी कशी द्यावी, लोकशाहीची मुळे कशी बळकट करावीत– याची स्पष्ट आणि वैज्ञानिक उत्तरे देणारा एकमेव द्रष्टा नेता म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. भारतीय संविधानाने जात, धर्म, वंश, लिंग या आधारांवरील भेदभावावर कठोरपणे गदा आणली. समाजातील सर्वात खालच्या थरातील लोकांना शिक्षण, प्रतिनिधित्व, हक्क आणि स्वाभिमान दिला. हा दस्तऐवज म्हणजे खऱ्या अर्थाने सामाजिक लोकशाहीचा महामंत्र आहे. या दस्तऐवजाच्या शक्तीनेच भारतातील वंचित समाज आत्मविश्वासाने उभा राहू शकला, आणि त्याला आपल्या हक्कासाठी आवाज उठवण्याची ताकद मिळाली.

डॉ. आंबेडकरांचे विचार आजही तितकेच ज्वलंत आणि मार्गदर्शक आहेत. देशात वाढत्या विषमता, अंधश्रद्धा, कट्टरता आणि सामाजिक तणाव यांच्या काळात संविधानाच्या मूल्यांचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. मनुवादी विचारांच्या ढगांतून मुक्त होऊन विज्ञान, विवेक आणि मानवतेचा मार्ग स्वीकारणे–हीच बाबासाहेबांना खरी आदरांजली.

महापरिनिर्वाण दिन हा केवळ स्मरणाचा दिवस नाही; तो प्रतिबद्धतेचा दिवस आहे.

जनतेला न्याय देणाऱ्या, महिलांना सन्मान देणाऱ्या, वंचितांना प्रतिष्ठा देणाऱ्या, आणि प्रत्येक नागरिकाला समान संधी देणाऱ्या त्या भव्य स्वप्नाला साकार करणे–हीच आपली राष्ट्रीय जबाबदारी.

आज आपण बाबासाहेबांना आठवतो तेव्हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची भव्यता आणि विचारांची प्रखरता पुन्हा पुन्हा जाणवते. त्यांनी दिलेला ऐतिहासिक दस्तऐवज–भारतीय संविधान–हा भारताची खरी ओळख आहे; आणि तो असताना भारत कोणत्याही प्रकारच्या अन्यायाला कायम हरवू शकतो.

६ डिसेंबर हा दिवस आपल्याला सांगतो –
बाबासाहेब गेले नाहीत; ते आपल्या प्रत्येक न्यायाच्या लढ्यात, प्रत्येक प्रश्नात, प्रत्येक स्वप्नात आजही जिवंत आहेत.

आज त्यांच्या कार्याचा गौरव करणे व त्याची कुरघोडी करणे यांना लगाम घालणं आवश्यक आहे तीच खरी आदरांजली!


भारतीय संविधानाचे खरे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत हे जगाने निर्विवादपणे स्वीकारले आहे; परंतु भारतात अजूनही काही जातीय पूर्वग्रहांनी विषारी मनोवृत्ती बाळगणारे लोक सत्य स्वीकारण्यास तयार नाहीत. ते बी. एन. राव यांनी संविधान लिहिले असा हास्यास्पद दावा करून समाजात भ्रम पसरवतात. असा इतिहास–विकृतीचा प्रयत्न गंभीर आहे आणि त्यावर सरकारने कारवाई करणे अत्यावश्यक आहे; परंतु तसे न होत असल्याने सत्य जनतेपर्यंत पोहोचवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.

सत्य असे की–बी. एन. राव हे संविधान सभेचे सदस्य नव्हते.
ते फक्त Constitutional Advisor होते.
त्यांनी–
एकही दिवस संविधान सभेच्या चर्चेत भाग घेतला नाही,
एकही कलमावर भाषण केले नाही,
एकही दुरुस्तीला उत्तर दिले नाही,
मसुदा समितीत सहभाग घेतला नाही.
त्यांचा सन्मान सल्लागार म्हणून राहतो, परंतु संविधानाचे शिल्पकार म्हणणे ही ऐतिहासिक चूक आहे.

संविधान निर्मितीचा खरा प्रवास आणि त्यातील डॉ. आंबेडकरांचे विराट योगदान

भारतीय संविधान हा केवळ कायद्यांचा संग्रह नाही; तो भारतीय लोकशाहीचा श्वास आहे–हजारो वर्षे पायदळी तुडवलेल्या समाजाला प्रतिष्ठेने उभे करणारा प्राणवायू आहे. हा दस्तऐवज एका महामानवाच्या बुद्धी, संघर्ष, तत्त्वज्ञान आणि मानवतावादातून जन्मला–तो महामानव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

गोलमेज परिषद: भारतीय संविधानाचे पहिलं बीज
ब्रिटिशांनी १९३० ते १९३२ दरम्यान लंडनमध्ये तीन गोलमेज परिषद घेतल्या. भविष्यातील भारतीय संविधानाची चौकट, मतदान हक्क, दलित–




अल्पसंख्यांक यांचे राजकीय अधिकार आणि फेडरल स्ट्रक्चर यावर येथे चर्चा झाली.
यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी–
Universal Adult Franchise (सर्वांना मतदानाचा अधिकार)
Separate Electorates
केंद्र–राज्य अधिकारविभाजनाचा आधुनिक फेडरल ढाचा
सामाजिक न्यायाशिवाय राजकीय लोकशाही अशक्य असे निर्णायक, आधुनिक आणि क्रांतिकारी विचार मांडले.
भारताच्या संविधानातील बहुतांश तत्त्वे याच परिषदांतून जन्मली.
१९४६ मध्ये ते संविधान सभेत निवडून आले; पण फाळणीच्या वेळी खुलना मतदारसंघ पाकिस्तानात गेल्याने त्यांचे सदस्यत्व रद्द झाले.
परंतु इतिहासाने स्वतःचा मार्ग तयार केला–
१९४७ मध्ये बॉम्बे प्रांताने त्यांना पुन्हा संविधान सभेत पाठवले.
पूर्व बंगालचे वंचितांचे नेते जोगेंद्रनाथ मंडल यांनीही त्यांना आणण्यासाठी निर्णायक साथ दिली.
हा क्षण भारतीय इतिहासातील सर्वात अर्थपूर्ण–वंचितांनी स्वतः वंचितांच्या मुक्तीचा महामार्ग तयार केलेला क्षण.

१७ डिसेंबर १९४६ : डॉ. आंबेडकरांचे पहिले भाषण
त्यांचे पहिले भाषण तर्क, कायदेविचार आणि सामाजिक न्यायाच्या सिद्धांतांनी भरलेले होते.
संपूर्ण सभागृह त्या भाषणाने प्रभावित झाले आणि एकमुखाने मान्य केले–
भारताचे संविधान लिहायचे असेल तर यांच्यापेक्षा योग्य व्यक्ती नाही.

२९ ऑगस्ट १९४७ रोजी मसुदा समिती स्थापन झाली आणि डॉ. आंबेडकर यांची अध्यक्षपदी सर्वसंमतीने निवड झाली.
समितीत सात सदस्य होते, पण प्रत्यक्ष काम करणारा हात एकच–डॉ. आंबेडकर.
काही सदस्यांनी राजीनामे दिले
काही आजारी पडले
काही उपस्थितच नव्हते
परंतु संविधानाचा मसुदा, तर्कशुद्धता, भाषा, रचना, ७,६३५ दुरुस्त्यांचे परीक्षण–हे सर्व काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकहाती केले.
इतिहासकार ग्रॅनव्हिल ऑस्टिन यांनी म्हणून लिहिले–
India's Constitution is essentially the handiwork of Dr. Ambedkar.
२१ फेब्रुवारी १९४८ रोजी डॉ. आंबेडकरांनी ३१५ अनुच्छेद व ८ अनुसूच्यांसह संविधानाचा पहिला मसुदा संसदेत सादर केला.
तो आठ महिने लोकांसाठी खुला ठेवण्यात आला.
१९४८ ते १९४९ दरम्यान संविधान सभेत १ वर्ष विस्तृत चर्चा झाली.
७६५३ दुरुस्त्या सुचल्या
२४७३ दुरुस्त्यांवर चर्चा
त्यांच्या तर्कनिष्ठ उत्तरेनंतर सभागृहातील गोंधळ झटक्यात नाहीसा होत असे.
कलम ३२ वरची चर्चा दोन दिवस चालली.
त्याला डॉ. आंबेडकरांनी संविधानाचे हृदय म्हटले.
पहिल्या मसुद्यात झीशरालश्रश नव्हती.
१५ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर १९४९ या ११ दिवसांच्या चर्चेनंतर डॉ. आंबेडकरांनीच उद्देशिका अंतिम स्वरूपात लिहिली.
भारतीय स्वातंत्र्याचा बौद्धिक दस्तऐवज म्हणून संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी औपचारिकरीत्या स्वीकारले गेले.

संविधान सभेतील विद्वानांचे मत डॉ. आंबेडकरांविषयी
टी. टी. कृष्णमाचारी
He is the architect of the Constitution of India.
डॉ. राजेंद्र प्रसाद
मी पाहिले आहे–आंबेडकरांनी संविधानाला फक्त रूप दिले नाही, तर आत्माही दिला.
पं. जवाहरलाल नेहरू
त्यांचे योगदान अद्वितीय आहे.
सरदार पटेल
यांच्यापेक्षा योग्य व्यक्ती मिळालीच नसती.
डॉ. एम. व्ही. पायली
त्यांना भारताच्या संविधानाचे जनक म्हणणे योग्य आहे.
नानी पालखीवाला
इतके विलक्षण कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व आज आपल्यात नाही.
ग्रॅनव्हिल ऑस्टिन
भारतीय संविधान = सामाजिक दस्तऐवज, आणि त्याचे शिल्पकार डॉ. बाबासाहेबआंबेडकर.
१९५२/१९५३ मध्ये त्यांनी दिलेल्या LL.D. सन्मानपत्रात लिहिले–
Dr. B. R. Ambedkar - the principal architect and framer of the Indian Constitution.
ही जगातील सर्वोच्च बौद्धिक संस्थेची अधिकृत शिक्कामोर्तब केलेली मान्यता आहे.
भारत सरकारनेही अधिकृतपणे घोषित केले–
भारताच्या संविधान निर्मितीतील आणि सामाजिक न्यायातील योगदानामुळे डॉ. आंबेडकरांना भारतरत्न प्रदान करण्यात येत आहे.
हा एक ठोस सरकारी पुरावा–डॉ. आंबेडकरच संविधानाचे शिल्पकार आहेत
संविधान सभेतील सर्व सदस्यांचा सन्मान असला तरी–
समानता, धर्मनिरपेक्षता, मूलभूत अधिकार, आरक्षण, सामाजिक न्याय, संघराज्य रचना, न्यायव्यवस्थेची स्वायत्तता, अस्पृश्यतेचा अंत–
या सर्वाचा पाया बाबासाहेबांच्या प्रचंड विद्वत्तेने घातला आहे.
त्यांच्याशिवाय भारतीय संविधानाची कल्पनाही अशक्य होती.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहिले नाही
ते त्यांनी जगले.
त्यांनी संविधान निर्माण केले नाही–
ते त्यांनी राष्ट्राला न्याय, समता आणि स्वातंत्र्याचा आत्मा दिला.
भारतीय संविधान म्हणजे–
त्यांच्या विचारांची जिवंत प्रतिमा,
त्यांच्या वेदनेचा विजय,
आणि मानवतेवरील त्यांच्या अविचल श्रद्धेचा पवित्र ग्रंथ.
म्हणूनच–
भारतीय संविधानाचे खरे, तेजस्वी, निर्विवाद शिल्पकार म्हणजे फक्त आणि फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरच.

**–अनिल वैद्य**
**माजी न्यायाधीश**
**९६५७७५८५५५**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने कोटी कोटी प्रणाम!

नुकतीच देशाचे शिल्पकार : आंबेडकर द्वेष ( Nation Builder : hate ambedkar) ही अनुसया आर्ट्सची संतोष कांबळे दिग्दर्शित शॉर्ट फिल्म बघण्याचा योग आला. त्यात कॉर्पोरेट कार्यालयातील कर्मचारी चर्चा करताना, सहा डिसेंबरला होणार्या गर्दीमुळे शिवाजी पार्कमध्ये अतिशय घाण होऊन, आठवडाभर तिकडे जाण्याची ईच्छा होत नाही.एव्हढी गर्दी का होते? त्यांना रेल्वे फुकट असते. अशी कुचेष्टेने चर्चा करीत असताना, त्यातील महिला कर्मचारी विचारते की, कोण हे डॉ. आंबेडकर ? त्यांनी देशासाठी काय केलय? त्यावर आंबेडकरी अनुयायी त्यांना सांगतो की, आपल्या उद्धारकर्त्याला ६ डिसेंबरला अनुयायी श्रद्धेने अभिवादन करायला चैत्यभूमीवर येतात . ते काही फुकटात येत नाहीत. याउलट त्या दिवशी रेल्वेचे उत्पन्न वाढते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे शिल्पकार असून, दामोदर व हिराकुड प्रकल्प त्यांच्या संकल्पनेतून साकार झाले आहेत. त्यांच्या प्रॉब्लेम ऑफ रुपीज ह्या ग्रंथानुसार रिजर्व बँकेची उभारणी केली आहे. त्यांनी समता, स्वातंत्र्य व बंधुभाव आधारित, उत्कृष्ट संविधान देशाला दिले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे स्त्रियांना चूल आणि मूल ह्यातून बाहेर काढून शिक्षण व मतदानाचा अधिकार दिला. तसेच स्त्रियांसाठी हिंदू कोड बिल संसदेत सादर केले. ते मजूर मंत्री असताना, स्त्री कर्मचार्यांना बाळंतपणाची रजा, कामगारांना आठ तासाची ड्युटी, कामाच्या अधिकच्या तासांचा मोबदला, त्यांच्या हक्कांच्या सुरक्षेसाठी युनियनला मान्यता, भविष्य निर्वाह निधी, आदी कायदे केले. हे ऐकल्यानंतर सॉरी म्हणत चर्चा संपते. इथे मी एक गोष्ट स्पष्ट करू इच्छितो की, बाबांच्या महापरीनिर्वाण दिनी इतक्या प्रचंड संख्येने अनुयायी चैत्यभूमीवर अभिवादन करण्यास येतात की, राज्य सरकार आणि मुंबई महानगरपालिकेने कितीही सुविधा उपलब्ध करून दिल्या तरी त्या कमीच पडतात. त्यामुळे घाण होणे सहाजिकच आहे. परंतु ७ डिसेंबर रोजी सकाळी मुंबईतील अनेक आंबेडकरी संघटनांचे तरूण कार्यकर्ते महानगरपालिकेच्या कर्मचार्यांच्या बरोबर तो सर्व परिसर स्वच्छ करतांना दिसून येतात. जे लोक कुत्सितपणे टीका करतात त्यांना हे दिसत नाही की काय ?.वास्तविक पाहता, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर आणि राष्ट्रहिताच्या दृष्टीने जगातील सर्वोत्कृष्ट समता ,स्वातंत्र्य, बंधुभाव, धर्म निरपेक्ष लोकशाही आधारित संविधान या देशाला दिले. ते सरकारमध्ये मंत्री असतांना कितीतरी योजना कष्टपूर्वक कार्यान्वित केल्या. तत्कारण देशातील सर्व थरातून त्यांना अभिवादन अपेक्षित आहे. परंतु तसे होतांना दिसत नाही, याउलट त्यांची व त्यांच्या अनुयायांची टिंगल करण्यात धन्यता मानणाऱ्यांची संख्या खूप आहे. अशा लोकांची कीव करावीशी वाटते. बाबासाहेबांविषयी आकसापोटी जाणूनबुजून पसरविण्यात आलेल्या चुकीच्या माहितीमुळे त्यांच्यावर टीका करणारे खूप लोक आहेत. त्यांनी फक्त दलितांसाठीच काम केल्याचा गैरसमज पसरविण्यात सनातनी लोकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. बाबासाहेब खरेच असे संकुचित होते काय?

मग त्यांनी राष्ट्रासाठी केलेले योगदान खोटे आहे काय? त्यांनी हिंदु कोड बिल का व कुणासाठी लोकसभेत मांडले ? तसेच ते स्थगित केल्याचे समजताच क्षणाचा ही विलंब न लावता त्यांनी मंत्री पदाचा राजीनामा का दिला? त्यात फक्त दलित स्त्रियांच्या हक्कांबाबत विचार केला होता का? याबाबत संक्षिप्त चर्चा करू या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ठाम मत होते की,कोणत्याही समाजाचे मूल्यमापन, त्या समाजातील महिलांच्या स्थितीवर अवलंबुन असते. कोणत्याही देशाच्या प्रगतीसाठी महिलांचा विकास अत्यंत आवश्यक आहे. जर विकासाचे शिखर गाठायचे असेल, तर महिलांना सुशिक्षित व सशक्त केले पाहिजे. भारतातील सर्व स्त्रियांना जाचक रुढी आणि परंपरांपासून सुटका मिळावी व त्यांची सार्वत्रिक उन्नती होऊन, त्यांना समानतेची वागणूक मिळावी. यासाठी त्यांनी तीन वर्षे अभ्यास करून ह्या विधेयकाचा मसुदा तयार केला. तो १९४८ साली संविधान सभेत सादर केला.



त्यांचे असे मत होते की, जाती व्यवस्थेमध्ये स्त्रियांना कमी लेखले जात असल्यामुळे, हे विधेयक मंजूर झाले तर, त्यांना अधिकार प्राप्त होतील. त्याचा देशाच्या विकासासाठी फायदा होईल. स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार, द्विभार्या प्रतिबंधक कायदा, विधवा व मुलींना संपत्तीत समान वाटा, विधवांचा पुनर्विवाह, हे सर्व अधिकार हिंदू कोड बिलाची देण आहे. त्यांनी २४/०२/१९४९ रोजी हे बिल संसदेत मांडले. त्यावर संसदेत अनेकदा चर्चा झाली. हे बिल हिंदू धर्मातील अनेक कुप्रथाना दूर करणारे होते. जे लोक परंपरेच्या नावाखाली कट्टरतावादि सनातनी प्रथा जिवंत ठेऊ इच्छित होते ,त्यांनी ह्या बिलास जोरदार विरोध केला. ह्यात प्रामुख्याने राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद, गृहमंत्री सरदार वल्लभ भाई पटेल, उद्योगमंत्री श्यामाप्रसाद मुखर्जी, हिंदु महासभेचे पंडित मदन मोहन मालविय व पट्टाभी सीतारामय्या इतर दिग्गज नेते होते. त्यांच्या समोर पंडित नेहरू हतबल झाले. दुर्दैव म्हणजे काही सनातनी स्त्रिया देखील ह्या बिलाच्या विरोधात गेल्या. पंडित नेहरूंनी दिल्लीहून बाबासाहेबांना तार पाठवली. त्यात ते म्हणतात की, हिंदू कोड बिलाला देशात सर्वत्र विरोध असून, ते संसदेत मंजूर होणार नाही.त्यातील मागण्यांना प्रचंड विरोध आहे. त्यामुळे नवीन वाद निर्माण होईल. यास्तव सदर विधेयक स्थगित करीत आहोत. तुमची स्त्रियांविषयी तळमळ आम्ही समजतो, तुम्ही देखील आम्हाला समजून घ्या. तेव्हा बाबासाहेबांनी रागावून त्यांना प्रत्युत्तर दिले की, स्त्रियांना मूलभूत अधिकार मिळावेत म्हणुन मी हे बिल संसदेत मांडले. ते मंजूर न होता, तहकूब करण्यात आले. ह्याचे मला अतिशय दुःख झाले. खरे तर या देशातील समाज सुधारणांच्या हेतूने मी मंत्रीमंडळात सहभागी झालो. त्यात स्त्रियांना मूलभूत अधिकार मिळावेत हा मुद्दा महत्वाचा आहे. जर माझा हेतू सफल होत नसेल, तर माझ्या मंत्री पदाचा काय उपयोग ? त्यांनी हिंदू कोड बिलाचा खून झाला. असे म्हणत २५/ ११/१९५१ रोजी मंत्रीपदाचा राजीनामा दिला. हिंदू कोड बिल स्थगित केले म्हणुन,आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा देणारे पहिले व्यक्ति अशी इतिहासात नोंद झाली आहे. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुका नंतर हे बिल टप्प्या टप्प्याने मंजूर झाले. त्याचे चार तुकडे केले. १) हिंदू विवाह कायदा, २) हिंदू वारसाहक्क कायदा, ३) हिंदू अंडरएज पालकत्व कायदा, ४) हिंदू दत्तक व पोटगी कायदा. ह्याचा अर्थ एकच होतो की, आपल्या देशातील पुरुष प्रधान संस्कृतीतील सनातनी लोकांना धर्मशास्त्र आधारित समाज व्यवस्थेला धक्का बसू द्यायचा नव्हता. भारतातील स्त्रीला चूल आणि मूल ह्यातून मुक्त करून विकासाच्या दिशेने भरारी घेण्यास, त्यांचे सनातनी विचार आडकाठी करीत होते. त्यावर कळस म्हणजे एक शूद्र दलित ह्या सुधारणा करू पाहतो. ही गोष्ट त्यांच्या पचनी पडली नाही. हे मात्र निर्विवाद सत्य आहे.

आजच्या धावपळीत तसेच दिवसभर मनोरंजन उपलब्ध असल्यामुळे वाचन संस्कृती जवळजवळ लोप पावली आहे.जगाने बाबासाहेबांच्या कार्याची दखल घेतल्याचे दिसून येते परंतु दुर्दैव असे की, जातीयतेच्या द्वेषातून बाबासाहेबांचे चुकीचे चित्र भारतीय जनमानसाच्या मनावर बिंबवण्यास सनातनी यशस्वी झाल्याचे दिसून येते. म्हणुन बाबासाहेबांची खरी माहिती सगळ्यांना समजणे अतिशय गरजेचे असल्यामुळे इतिहासाची पाने पुन्हा पुन्हा चाळून, छोट्या छोट्या लेखांतून, सर्वांना त्यांच्या ऐतिहासिक कार्याची माहिती करून देणे, ही काळाची गरज आहे. जेणेकरून बाबासाहेबांच्या बाबतीत असलेले गैरसमज दूर होण्यास मदत होईल .जर आपण असे करू शकलो तर, ती बाबांना खरी आदरांजली ठरेल. जाता जाता एव्हढेच लक्षात आणून द्यावेसे वाटते की, संविधानात स्त्रियांच्या अधिकारांचा समावेश केला नसता तर, या देशाच्या राष्ट्रपती, पंतप्रधान पदी स्त्रिया विराजमान झाल्या असत्या का ?या देशातील महिला अंतराळात पोहोचली असती का? एव्हढेच काय! नुकत्याच पार पडलेल्या जागतिक महिला क्रिकेट स्पर्धेत, भारतीय महिला क्रिकेट संघ अशी दैदीप्यमान कामगिरी करू शकला असता काय ?जयभीम.

**–अरुण निकम.**
**९३२३२४९४८७.**

# महिलांना महानता महामानवामुळे

ज्याने आपल्या आयुष्यातील एक एक क्षण अखिल मानवजातीच्या कल्यानासाठी खर्च केला. शोषित, पीडित, दुःखी अशा माणसांना वेदनामुक्त दुःख मुक्त करून निर्वाण पद प्राप्त केले. आणि स्वतः या जगातून मुक्त झाले असे महामानव म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर अशी एकमेव व्यक्ती ज्यांच्या निधनाला महापरिनिर्वाण म्हंटल्या जाते. मानव म्हणून जन्माला आल्यानंतर त्याचा महामानव सहजरीत्या होतं नाही त्यासाठी अपार संघर्ष करावा लागतो. आणि एक संवेदनशील मन असावं लागतं. त्या मनाने पुढच्या व्यक्तीच्या मनाच्या भावना वेदना जाणल्या पाहिजे. बाबासाहेबाकडे असं संवेदनशील मन होतं. लहाणपणापासून त्यांनी विषमतेचे चटके सहन केले. वर्गाच्या बाहेर बसुन शिक्षण घेतले. अपमान सहन केले. पण माणसाला माणूस म्हणून जगता यावे. हे ध्येय उराशी बाळगून आपल्या ज्ञानाच्या बळावर त्यांनी ही अन्यायकारी व्यवस्था उलथून पाडली. चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, काळाराम मंदिर प्रवेश हे सत्याग्रह आज ही क्रांतिकारी आणि प्रेरणादायी ठरतात. त्यांनी केवळ स्वतःत सामर्थ्य निर्माण केले नाही तर या मातीतल्या प्रत्येक कणाकणामध्ये क्रांती निर्माण केली.त्यांचा हा लढा धर्माच्या विरुद्ध आहे असं विष पेरण्यात आलं पण डॉ आंबेडकर हे मनुस्मृतीने निर्माण केलेल्या अनिष्ट चालीरिती आणि परंपरा याने पिचलेल्या महिलानासाठी ते अमृत ठरले. कारण केवळ श्वास आहे म्हणून जगणं त्याला जगणं म्हणत नाही तर त्या शरीरात श्वासापेक्षाही स्वाभिमान असणं महत्वाचं असतं या देशातील प्रत्येक स्त्रीचा स्वाभिमान म्हणजे हिंदुकोडबील होय. एक स्त्री प्रत्येक क्षेत्रात स्वाभिमानाने वावरत असेल तर त्याचे श्रेय फक्त डॉ आंबेडकर यांना जाते. धर्माने नाकारलेले पण संविधानाने दिलेले हक्क जाणूया...

धर्माने या देशातील स्त्रीच्या हातात फक्त पाळण्याची दोरी दिली पण बाबासाहेबांच्या संविधानाने या देशातील स्त्रीच्या हातात सत्तेची दोरी दिली. आज सरपंच ते राष्ट्रपती या पदावर एक महिला जाऊ शकते हा अधिकार बाबासाहेबांनी दिला. मुलगा हा वंशाचा दिवा मानल्या जातो पण मुलगी देखील पणती आहे. आणि तिलाही वडिलांच्या संपत्तीत समान अधिकार दिला. अमेरिका हे प्रगत राष्ट्र असताना देखील तिथे महिलांना मतदानाचा अधिकार जवळपास १५०वर्षांनी मिळाला. सौदी अरेबिया मध्ये नुकताचं मिळाला पण आपल्या भारतामध्ये संविधान अंमलात येताच मतदानाच अधिकार मिळाला. ही किमया त्या महामानवाची आहे. कार्यालयातील महिलांना तिच्या कर्तृत्वात तिचे मातृत्व आड येऊ नये म्हणून एका पित्याने आपल्या मुलीची काळजी घ्यावी तशी प्रसूती रजा ची तरतूद बाबासाहेबांनी घटनेत केली.



आणि अशी रजा देणारा जगातला पाहिला देश भारत ठरला. या देशातील प्रत्येक स्त्रीला आपला पती निवडण्याचा अधिकार या घटनेने दिला. पण हा अधिकार बजावणे आज ही स्त्रीसाठी जीवघेणे ठरत आहे.आंचलने आईवडीलांच्या विरुद्ध जाऊन लग्न केले खरं तर तिने घटनेने दिलेला पती निवडण्याचा आणि अंतरजातीय विवाह करण्याचा अधिकार बजावला. पण यामध्ये निरागस असणारा सक्षम याची हत्या करण्यात आली... पण आंचलने मृतदेहाशी लग्न करून जात व्यवस्थेला सुरुंग लावले आणि खऱ्या अर्थाने संविधान हे पुस्तकं नव्हे तर जगण्याचं बळ आहे हे दाखवून दिले. तिच्या या हिम्मतीला मानाचा जय भीम पण आज ही पुरोगामी महाराष्ट्रमध्ये या घटना घडण म्हणजे हे व्यवस्थेचे अपयश आहे. शासनाने तात्काळ न्याय द्यावा आणि पुन्हा अशा घटना घडणार नाही याची काळजी घेणं गरजेचे आहे कारण लाडक्या बहिणीला केवळ पैसा नको तर स्वातंत्र्य नि सुरक्षितता हवी आहे. यानंतर महिलांना घटस्फोटाचा अधिकार देऊन बाबासाहेब यांनी तिला खऱ्या अर्थाने पुरुषीय अहंकारातून मुक्त केले. प्रत्येक महिलेला तिच्या कामाचा मोबदला हा पुरुषाइतकाच मिळावा म्हणून समान काम समान वेतन ची कलम ३९व अन्वये तरतूद केली. या देशातील प्रत्येक महिलेला वेदनेतुन मुक्त करणारा एकमेव महामानव म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होतं.तु अनिष्ट परंपरेच्या विरुद्ध रणशिंग फुंकले म्हणून बघ मी सारे आकाश कवेत घेतले...

जीवन माझे होते पशुतुल्य तु दिलेस संविधान आणि मी मानव झाले.


अशा या महामानवास महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन.....

**–प्रियंका डंबाळे**
**संचालिका २६ जानेवारी संविधान विचारमंच**

# बाबासाहेब महान देशभक्त व अर्थशास्त्रज्ञ

१९२३ मधे बाबासाहेबांनी शोध प्रबंध THE PROBLEM² OF RUPEES : (ITS ORIGIN AND ITS SOLUTION( रुपया पुढील समस्या : उगम व उपाय) लंदन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ( इंग्लैंड) इथे प्रस्तुत केला. या शोधप्रबंधच्या आधारावर अत्यंत नामांकित व मानांकित यूनिवर्सिटी लंदन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सने बहु प्रतिष्ठित डिग्री D.Sc.(डॉक्टर ऑफ साइंस) बाबासाहेबांना प्रदान केली. अर्थशास्त्र या विषयातील जगातील सर्वोच्च समजल्या जाणारी ही पदवी आहे. या ऐतिहासिक घटनेला शंभर (१००) वर्ष पूर्ण झालेत . भारतीय रिज़र्व बैंक च्या स्थापनेत या प्रबंधाचे महत्व पूर्ण योगदान आहे. हिल्टन यंग आयोग च्या शिफारशी वरून भारतीय रिज़र्व बैंक ची स्थापना झाली. १९२३ मधे ह्या शोध प्रबंधावर डॉक्टर ऑफ साइंस पदवी मिळाल्यावर या हिल्टन यंग आयोगाने साक्ष देण्यासाठी बाबासाहेबांना १९२५ मधे पाचारण केले व साक्ष नोंदविल्या गेली. या हिल्टन यंग आयेगाने १९२६ मधे रिपोर्ट प्रस्तुत केली ज्याच्या आधारावर भारतीय रिज़र्व बैंक ची स्थापना झाली. या पूर्वी बाबासाहेबांनी कोलंबिया (अमेरिका) विद्यापीठातील एम. ए, पी एच. डी तसेच लंदन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स विद्यापीठातील एम. एससी. या पदव्या प्राप्त केल्या आहेत. बाबासाहेबांचा हा प्रबंध ब्रिटिश राज्यकर्त्यांना हादरा देणारा व त्यांच्या आर्थिक नीतिची, भारता विषयीच्या धोरणाची निंदा करणारा, धज्जिया उड़विनारा होता त्यामुळे ब्रिटिशांनी पदवी देण्यास टाळाटाळ केली, किम्बहुना नकार सुद्धा दिला. बाबासाहेबांना आपले विचार मागे घ्यायला सांगितले. बाबासाहेबांना सत्याशी प्रतारणा करणे विसंगत वाटल्यामुळे आपले विचार मागे घेण्यास ठाम नकार दिला. बाबासाहेबांनी कळविले की मी जे मुद्दे मांडले आहेत ते पूर्ण अभ्यास करून व भारतीय जनतेच्या भल्याचा विचार करून मांडले आहेत त्यामुळे त्यात बदल करण्याचा प्रश्ननच नाही, डी. एससी. पदवी नाही मिळाली तरी चालेल. बाबासाहेब फक्त भाषेची तीव्रता/उग्रता सौम्य करायला राज़ी झालेत परंतु विचार/तथ्य मागे घ्यायला त्यांनी स्पष्ट नकार दिला. सौम्य भाषेतही बाबासाहेबांनी ब्रिटिशांना फुलिश, नॉनसेंस सारखे विशेषण दिलेत. प्रबंधात रिसर्च/शोध करून सत्यता व तथ्य समोर आणलेले होते त्यामुळे ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञाना नाईलाजाने प्रबंध स्वीकारने भाग पडले.

ब्रिटिश राजवटीत भारतीय उपखंडात अर्थशास्त्रात डी.एससी. ही पदवी मिळविणारे बाबासाहेब एकमेव होते. बाबासाहेबांनी मुद्देसूद पणे सिद्ध केले की भारताची अर्थव्यवस्था सुदृढ़ व मजबुत होती, चलन व्यवस्था मजबूत होती परंतु ब्रिटिशांच्या चुकीच्या धोरण व नीतिमुळे तसेच चुकीच्या चलन व्यवस्थेमुळे ती कमजोर झाली, डबघाईस आली. बाबासाहेब लिहतात की ब्रिटिशांनी आपल्या फायद्यासाठी व अमाप भारतीय सम्पति इंग्लैंडला नेण्यासाठी चलन व्यवस्थेचा दुरूपयोग केला. इंग्रजांच्या आर्थिक नीति, धोरणाची व चलन व्यवस्थेची कटु व तीव्र आलोचना केली, त्यांना मूर्ख म्हणून सम्बोधिले, ब्रिटिशांना शासन करण्यास लायकीचे नाहीत, अयोग्य आहात हे खड़े बोल सुनविले आणी ही बाबासाहेबांची सौम्य केलेली भाषा होती तर ओरिजिनल भाषा किती तीव्र, उग्र, कटु असेल याची कल्पना येते. ज्यावेळेस हा शोध प्रबंध प्रस्तुत केला ( १९२३ मधे) त्यावेळेस भारतात ब्रिटिशांचे साम्राज्य होते, ब्रिटिशांच्या विरुद्ध शब्द ही काढण्याची हिम्मत होत नव्हती परंतु बाबासाहेबांनी हे खड़े बोल/वचन सुनविले तेही लंदन मधे जाऊन व वास्तव्य करून. बाबासाहेबांचे हे कार्य एखाद्या सिंहाला त्याच्या गुहेत जाऊन हात घालून त्याची आयाळ पकड़ण्यासारखेच होते यात शंका नाही. ब्रिटिश साम्राज्याच्या विरुद्ध बाबासाहेबांचा हा वैचारिक, बौद्धिक संघर्ष व युद्ध होते तेही वन मेन आर्मी (One Man Army). बाबासाहेब प्रबंधात म्हणतात की माझ्या या प्रबंधाचा उद्देश भारतीय चलन व्यवस्थेला स्वःताच्या भक्कम पायावर उभे करने आहे व हा प्रबंध भारताच्या गरीब जनतेचा विचार करून लिहला आहे. बाबासाहेब थोर समाज सुधारक, कायदे पंडित, समाज शास्त्रज्ञ सोबतच एक महान देशभक्त व अर्थशास्त्रज्ञ होते याची प्रचिती येते. यात बाबासाहेबांचा ज्वलंत राष्ट्रवाद दिसून येतो व त्यांना ब्रिटिशांचे एजंट म्हणणाऱ्यांची कीव येते. खरे ब्रिटिशांचे एजंट कोण होते हे जगजाहीर आहे, वेगळे सांगायची आवश्यकता नाही. प्रोफेसर एडविन कॅनन हे शोध प्रबंधासाठी बाबासाहेबांचे गाइड/मार्गदर्शक होते. प्रो. कॅनन यांनी बाबासाहेबांच्या बऱ्याच विचाराशी असहमती व्यक्त केली परंतु बाबासाहेबांच कार्य व विद्वत्तेच कौतुक केले आहे. प्राध्यापक केन्स इंग्लैंड चे नामांकित अर्थशास्त्रज्ञ होते. प्रा. केन्स ची धारणा की सुवर्ण विनियम



प्रमाण प्रणालीत रुपयाचे मूल्य/ कीमत आपोआप स्थिर होते बाबासाहेबांनी पुर्णपणे अमान्य केली, खंडन केले. बाबासाहेबांनी तथ्य व प्रमाण प्रस्तुत करून सिद्ध केले की जोपर्यंत रुपयाची सर्वसाधारण क्रयशक्ति स्थिर करत नाही तोपर्यंत रुपयाची कीमत/मूल्य इतर कोणत्याही मार्गाने स्थिर होऊ शकत नाही.

बाबासाहेबांनी प्रस्तुत शोध प्रबंधात सन १८०० ते १८९३ या कालावधीतिल भारतीय चलन व्यवस्थेचा ऊहापोह केला आहे. ग्रंथात द्विधातु (चांदी व सोने ) चलन पद्धती, चांदी चलन पद्धती, चांदी प्रमाण चलन पद्धती, सुवर्ण प्रमाण पद्धती, सुवर्ण विनियम प्रमाण पद्धती यांचे तार्किक विश्लेषण केले आहे. ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी इथली चलन व्यवस्था दोन प्रकारात (द्विधातु) होती : सोन्याची नाणी (मोहर) व चांदीची नाणी (रुपया). भारतीय वंशाचे राजे/महाराजे सोन्याची नाणी (मोहर) ला महत्व देत होते तर मुगल राजवटीत चांदीच्या नाण्याचे (रुपया) प्रमाण चलनात वाढले. भारत देश आर्थिकदृष्ट्या पुढारलेला देश होता, भारताचा व्यापार सम्पूर्ण जगभर होता. चलन व्यवस्था तीन इलाख्यात विभागली होती : बंगाल, बॉम्बे व मद्रास. जिलावार वेग वेगळे चलन अस्तित्वात होते व त्या जिल्ह्यातच चलन म्हणून मान्य होते. सत्ता ईस्ट इंडिया कम्पनी ने बळकावल्यावर त्यांच्या संचालक मंडळाने चलन व्यवस्थेत सुधार करण्याच्या हेतूने भारतात चांदीची नाणी (रुपया) (एक धातु) हे सर्व साधारण चलन म्हणून मान्यता दिली. ईस्ट इंडिया कंपनी चे संचालक मंडळ व तिन्ही (बंगाल, मद्रास व बॉम्बे) इलाखातील सरकारे यांच्यात मतभेद झालेत. सोन्याचे चलन व्यवहारातून काढायाला तिन्ही सरकारे तयार नव्हती, त्यांनी चक्क नकार दिला. परंतु संचालक मंडळ व ब्रिटिश साम्राज्याला चांदीची एक प्रमाण असलेली चलन व्यवस्था (एक धातु) पाहिजे होती व ही व्यवस्था १८३५ च्या कायदा ने लागू झाली. भारतातला ऊद्ध्योग व व्यापार वाढू नये म्हणून ब्रिटिशांनी बराच काळ कर आकारणी व जल वाहतुकीच्या कायदा द्वारे नियंत्रण ठेवले म्हणजे आयाती वर नाममात्र (२.५%)कर व निर्याती वर उच्चतम कर ( ५०% ते ५००% पर्यंत) लादुन भारताचा ऊद्योग व व्यापार डबघाईस आणला. ह्या अन्यायाच्या विरोधात मोठा लढा उभारला शेवटी १८४२ मधे कर कायदात सुधारणा करण्यात आली व जल वाहतूक कायदा रद्द करण्यात आला. ह्या नंतर भारतीय ऊद्योग व व्यापाराला गति मिळाली. चांदीची एक धातु चलन पद्धती सुरू झाली परंतु चांदीच्या उत्पादन वाढीचा वेग कमी होता त्यामुळे चलन साठा संकुचित झाला. एकीकडे भारताचा व्यापार वाढत होता तर दूसरीकडे चलन साठा संकुचित होता त्यामुळे चलन व्यवस्थेत गोंधळ निर्माण झाला. एकंदरित चलनी नाण्याची समस्या निर्माण झाली व व्यापारावर प्रतिकूल परिणाम झाला. व्यापारी व जनतेत रोष निर्माण झाला व विचारायला लागले की चांदीच्या एक धातु चलन पद्धती एवजी सोन्याच्या एकधातु चलन पद्धतीला स्विकारायला हरकत काय? कारण बऱ्याच देशामधे सोन्याची एक धातु चलन पद्धती अस्तित्वात होती, ब्रिटेन मधे ही सोन्याची एकधातु (पौंड) चलन पद्धती अस्तित्वात होती. लोकांनी व व्यापारी वर्गाने सोन्याच्या नाण्यांना कायदेशीर चलन म्हणून मान्यता दयावी अशी मागणी केली परंतु ब्रिटिश सरकार द्विधातु चलन पद्धतीच्या रूपाने सोन्याचे चलन वहीवाटात आणायला राजी नव्हते उपाय म्हणून त्यांनी कागदी (पूरक) चलन अस्तित्वात आणले. कागदी चलन कमी किमतीचे असल्यामुळे कागदी चलन येऊन सुद्धा चलनाची कमतरता पूर्वी प्रमाणेच भासत होती त्यामुळे सोन्याचा वापर चलन म्हणून बेकायदेशीरपणे होत होता. ब्रिटिश सरकार च्या चुकीच्या धोरणामुळे सोने आणि चांदीच्या किमतीच्या प्रमाणात प्रचंड गोंधळ निर्माण झाला, कीमतीमधे स्थिरता राहली नाही त्याचे दुष्परिणाम व्यापारावर व अर्थ व्यवस्थेवर झालेत. १८७२ मधे सुवर्ण माध्यमाचा पुनः विचार करण्यात आला. शेवटी खूप विलंबाने १८९२ च्या जवळपास सुवर्ण माध्यम आणले गेले व सुवर्ण प्रमाणाकडे वाटचाल शुरु झाली. सुवर्ण प्रमाण लागू करूनही चलन पद्धतीत सुधारणा झाल्याच नाहीत व अस्थिरता कायम राहली. १८९८ मधे फाऊलर कमेटीच्या सिफारशी स्वीकार करून सुवर्ण प्रमाणाकडून सुवर्ण विनियम प्रमाणाकडे वाटचाल शुरू झाली. सुवर्ण विनियम प्रमाण पद्धती ही रुपयाची सोन्याच्या रुपातली किमत टिकवून ठेवण्यास समर्थ आहे या प्रतिपादनावर आधारित होती परंतु स्थिरतेसाठी ही एकच कसौटी पूर्ण नव्हती त्यामुळे सुवर्ण प्रमाण पद्धतीकडे परत यावे लागले. बाबासाहेब म्हणतात भारतात चलन पद्धतीत जो गोंधळ झाला तो फाउलर कमीटीच्या सिफारशी (ज्या आधारावर सुवर्ण विनियम प्रमाण पद्धती लागू करण्यात आली) अंमलात आणल्यामुळेच झाला, जो कोणी ह्या शिफारशीना बुद्धिमत्तेच्या आविष्कार मानत असेल तर मानो पण माझ्या मते फाउलर कमेटीचा रिपोर्ट पूर्णपणे मूर्खपणाचा आविष्कार आहे. बाबासाहेबांनी आपली ही अतिजहाल प्रतिक्रिया निरनिराळी आकडेवारी देऊन सिद्धही केली. नामांकित अर्थतज्ञ प्रा. केन्स नी सुवर्ण विनियम प्रमाण चलन पद्धतीबद्दल मते मांडली होती त्या सर्वच मताशी बाबासाहेबांनी पूर्णःता असहमती दर्शवून पुराव्याच्या आधारावर प्रा. केन्स च्या मताचे प्रभावीपणे खंडन केले व दाखले, पुरावे, आकडेवारी देऊन स्पष्ट केले की जो पर्यंत रुपयाची क्रयशक्ती स्थिर होत नाही, तोपर्यंत रुपयाची किंमत स्थिर होऊ शकत नाही.रुपया पुढील समस्याः उगम व उपाय या ग्रंथाला १०० वर्ष पूर्ण झालीत. एका लेखामधे सम्पूर्ण ग्रंथाचा सारांश देणे शक्य नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी हा छोटासा प्रयत्न आहे. खात्री आहे सगळ्यांना पसंत येईल.

**–लक्ष्मण बोरकर**

# भारतीय रिझर्व बँकेचे जनक डॉ.बाबासाहेब आंबेडकर

महात्मा गांधी देशाच्या संविधान निर्मितीच्या अगोदर आपल्या सहकार्यांशी बोलताना म्हणतात, भारत देशाचे संपूर्ण अर्थकारण, राजकारण, समाजकारण, इतिहास, भाषावार प्रांतरचना विश्लेषण, भौगोलिक रचना, भारतीय व्यापार, शेती, भारतीय कामगारांचे प्रश्न, या विविध बाबतींची सखोल माहिती जर कोणाला असेल, तर ते डॉ.आंबेडकर हे आहेत. संविधान निर्मितीसाठी त्यांच्या सारखा विद्वान पंडित कोणी नाही. म्हणून कोणत्याही परिस्थितीत डॉ.आंबेडकरांना संविधान समिती मध्ये निवडून आणा.आर्थिक विकासासंदर्भात डॉ.आंबेडकर यांच्या मते, अल्पभूधारकांवर आधारित भारतीय शेतीची उत्पादकता व उत्पन्न कमी असण्याचे मुख्य कारण शेती मधील अल्प भांडवली गुंतवणूक हे आहे. फक्त शेतीच नव्हे तर कामगारांचे आर्थिक धोरण यावर सुद्धा त्यांनी विस्तृत विचार मांडणी केली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील संपुर्ण घटकांचा विश्लेषणात्मक अभ्यास केला होता. त्यात भारतीय अर्थव्यवस्था व त्यावरील समस्यांचे उपाय यावर त्यांनी जागतिक दर्जाच्या तीन पदव्या प्राप्त केल्या.अर्थशास्त्रावर तीन विद्वत्तापूर्ण प्रबंध कोलंबिया (अमेरिका) व लंडन विद्यापीठाला एमए, पीएचडी, व डीएस्सी, साठी सादर केले आणि विशेष म्हणजे पुढे तीनही प्रबंध पुस्तक रूपाने प्रकाशित करण्यात आले.


१) (Administration and Finance of the East India Company) ईस्ट इंडिया कंपनी : प्रशासन आणि वित्तप्रणाली यात १७९२ ते १८५८ या कालखंडातील ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराचा ऐतिहासिक आढावा, ज्यात ब्रिटिश सरकारच्या अधिपत्याखाली भारतीयांना कशा हालअपेष्टा भोगाव्या लागल्या त्यावर परखड भाष्य डॉ.आंबेडकरांनी स्पष्ट केले आहे.

२) (The Evolution of Provincial Finance in British India) ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती यामध्ये प्रामुख्याने १८३३ ते १९२१ या कालखंडातील ब्रिटिश भारतातील केंद्र शासन व घटक राज्ये यांच्यातील आर्थिक संबंधाचे चिकित्सक विश्लेषण जे केंद्र आणि राज्याच्या आर्थिक संबंधाच्या बाबतीत महत्वपूर्ण आहे.

३) (The problem of the Rupee : its origin and Its Solution) भारतीय रुपयाचा प्रश्न : उद्गम आणि उपाय या प्रबंधात भारतीय अर्थव्यवस्थेच्या घडीसाठी उपाययोजना बाबतीत अतिशय सूक्ष्म आणि चिकिस्तक पद्धतीने मांडणी केली आहे. 'भारतासाठी सुयोग्य चलन पद्धती कोणती?' आर्थिक धोरणे या व त्या काळाच्या गहन प्रश्नांची चर्चा करणारा अत्यंत मौलिक असा अर्थशास्त्रीय दस्तावेज आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया च्या स्थापनेत नेमके काय योगदान आहे हे महत्वाचे आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास आणि सुधारणा करण्यासाठी १९२४-२५ मध्ये ब्रिटिश सरकारने रॉयल समिती नेमली होती. त्यालाच (Hilton Young Commission) असेही म्हटले जाते. या समितीकडून अर्थव्यवस्थेवर बोलण्यासाठी डॉ.आंबेडकरांना आमंत्रित केले होते. आणि विशेष म्हणजे त्या समितीतील प्रत्येक सभासदांकडे (The problem of the Rupee) हे पुस्तक होते. भारतीय अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी प्रत्येक सभासद हा या पुस्तकाचा संदर्भ म्हणून उपयोग करू पाहत होता. हे पाहून डॉ.आंबेडकर हर्षित झाले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर या समिती समोर भारतीय चलनात असलेल्या अडचणी व त्यावरील उपाय, बँकिंग कार्यपद्धती कशी असावी, वित्तीय धोरण, चलनाचा मापदंड काय असावा, सामूहिक शेतीव्यवसाय, आर्थिक धोरण, जमीनदारी पद्धती, जमीन कर या सर्वांचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम, सर्वात महत्वाचे चलन विनिमय व्यवस्थेत 'सोने' हा मापदंड मानला पाहिजे असे त्यांनी ठासून सांगितले. पहिल्या महायुद्धानंतर १९३५ साली ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली असलेली भारतीय अर्थव्यवस्था सुरळीत चालू राहावी, म्हणून भारतीय रिझर्व्ह बँक स्थापन करण्याचे ठरले. आणि ही बँक (Hilton Young Commission) या समितीच्या तपशील लक्षात घेऊन स्थापन करण्यात आली. बाबासाहेबांनी लिहलेल्या वरील तीनही पुस्तक प्रबंधाचा उपयोग हा 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या' स्थापनेचा पाया ठरला. आणि ही मध्यवर्ती बँक अस्तित्वात आली.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुचवलेले मार्गदर्शक तत्वे आणि कार्यप्रणाली यावर आजही ही बँक तटस्थ उभी आहे. १ एप्रिल १९३५ मध्ये बँकेची स्थापना करण्यात आली खरी, मात्र १९४९ मध्ये ही खऱ्या अर्थाने भारतीयांच्या ताब्यात घेण्यात आली. बाबासाहेब हे किती महान अर्थशास्त्रज्ञ होते हे यावरून लक्षात येईल. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ साली ५०० व १००० रू.च्या नोटांचे विमुद्रीकरण केले. ही मूळ संकल्पना बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या (Problem of the Rupee) या पुस्तक प्रबंधामधून घेण्यात आली होती. सेवायोजन कार्यालयांची (Employment Exchange) स्थापना, (Skill Development) ची पायाभरणी याचे संपूर्ण श्रेय डॉ.आंबेडकरांना जाते. त्यांच्यामुळेच ही भारताला देणगी लाभलेली आहे.भारताचे महान अर्थशास्त्रज्ञ डॉ.अमर्त्य सेन ज्यांना अर्थशास्त्रामध्ये 'नोबेल पारितोषिक' मिळाले आहे ते असे म्हणतात, डॉ.आंबेडकर हे अर्थशास्त्रात माझे वडील आहेत. त्यांच्या ऐवढा जागतिक कीर्तीचा महान अर्थशास्त्रज्ञ होणे नाही.लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स, विद्यापीठात डॉ.आंबेडकरांचा पुतळा बसविण्यात आला आहे. त्याच बरोबर 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासन' देखील चालू करण्यात आले आहे. जगाने बाबासाहेबांचा खूप मोठा यथोचित सन्मान केला. मात्र भारताने ठइख बँकेच्या स्थापनेपाठीमागील सर्वात महान योगदान बाबासाहेबांचे असताना त्यांचा पाहिजे तेवढा सन्मान केला नाही. भारतासाठी ही फार मोठी दुर्दैवी बाब आहे असे खेदाने म्हणावेसे वाटते.

**–प्रा दिलीप आ जाधव, सांगली**
**सचिव कनिष्ठ महाविद्यालयीन**
**शिक्षक संघटना सांगली**
**(संदर्भ : मूकनायक)**

## बाबा!



बाबा,आज तुझ्या महापरिनिर्वाण दिनी मी ढसढसा रडणार नाही,
कारण माझ्या सर्वंकष लढ्यामध्ये पावलापावलावर मी तुझी रोमहर्षक सोबत अनुभवतो आहे.
बाबा, तुझ्या आमराईत पोसलेले कोणतेही विषारी साप पाहून मी आता निराशेने खचणार नाही,
कारण या सापांना ठेचण्याचं तूच दिलेलं सामर्थ्य माझ्यात निश्चित आहे.
बाबा, तुला भारतरत्न दिल्यानंतर .....
तुझी किंमत कमी करता येत नाही म्हणून त्यांनी भारतरत्नाचीच किंमत कमी करून टाकली.
आणि मग.....,
शिवाम्बू पिणार्या मोरारजी सारख्या संधीसाधूंनादेखील,
रॉयल्टी घेऊन ए मेरे वतन के लोगो म्हणणार्या धंदेवाईक गायीकेला देखील,
आणि विदेशात पैसे लपवणार्या क्रिकेटीयरला देखील जेंव्हा भारतरत्नाची खिरापत वाटली जाते.....,
तेंव्हा माझ्या रोमरोमात संतापाचा भडाग्नी भडकून उठतो.
त्याचवेळेस मी तुला भारतरत्न म्हणायचं बंद करून विश्वरत्न म्हणावयास सुरुवात करतो.
या घरभेद्यांची आणि या जातीयवाद्यांची मला आता खुन्नस येते आहे.
बाबा, आता तुझ्या चैत्यभूमीला आम्ही चैतन्यभूमी म्हणावयास सुरुवात केली आहे.
आता तुझ्या या चैतन्यभूमीतलं चैतन्य घेऊन मी शपथ घेतोय.
की या घरभेद्यांची आणि जातीयवाद्यांची मी चाळण केल्याशिवाय आता शांत बसणार नाही.
हा प्रण हेच आमचे आता तुला अभिवादन आहे!

**– विवेक मोरे**



